महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २३४ वे दिनांक : २०/०८/२०२६ वार : गुरुवार

## धनुष्यबाण आम्हालाच मिळावा; नाहीतर गोठवा : खा. अरविंद सावंत



**नवी दिल्ली :** शिवसेना पक्षाचे नाव आणि ‘धनुष्यबाण’ निवडणूक चिन्हावरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईला आता आणखी महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवादाच्या अखेरीस महत्त्वाची मागणी मांडली. ‘धनुष्यबाण चिन्ह आम्हाला देता येत नसेल, तर ते कोणत्याही गटाला देऊ नये, ते गोठवावे,’ अशी पर्यायी भूमिका सिब्बल यांनी न्यायालयासमोर मांडली.

या युक्तिवादानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत यांनी माध्यमांशी संवाद साधत सिब्बल यांच्या भूमिकेचे समर्थन केले. ‘धनुष्यबाण आम्हालाच मिळावा, ही आमची मुख्य मागणी आहे. मात्र तो आम्हाला मिळणार नसेल तर शिंदे गटालाही मिळू नये आणि तो गोठवला जावा,’ असे सावंत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणातील सुनावणी उद्याही सुरू राहणार असून त्यानंतर शिंदे गटाच्या वतीने युक्तिवाद होण्याची शक्यता आहे.

अरविंद सावंत म्हणाले की, कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर मांडलेली पर्यायी मागणी योग्य आहे. शिवसेनेचे ‘धनुष्यबाण’ हे निवडणूक चिन्ह ठाकरे गटाला मिळाले पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. मात्र, जर न्यायालयाच्या निर्णयानुसार ते आम्हाला देता येत नसेल, तर ते शिंदे गटालाही देता कामा नये.

धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याच्या मागणीसंदर्भात सावंत यांनी काँग्रेसमधील पूर्वीच्या फुटींचाही संदर्भ दिला. काँग्रेस पक्षात अनेकदा फूट पडली. मात्र, फुटीनंतर मूळ निवडणूक चिन्ह एखाद्या गटाला देण्याऐवजी ते गोठवण्यात आले होते, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे शिवसेनेच्या बाबतीतही अशीच भूमिका घेता येऊ शकते, असे सावंत यांनी म्हटले. “हा पहिल्यांदाच घडणारा प्रकार नाही. काँग्रेसमध्ये अनेकदा फूट पडली आणि त्यावेळी मूळ चिन्ह गोठवण्यात आले. त्यामुळे आम्हाला आमचे नाव आणि चिन्ह द्यायचे नसेल तर कोणत्याही एका गटाला ते देऊ नये,” असे ते म्हणाले.

धनुष्यबाण हे केवळ बाळासाहेब ठाकरे यांचे वैयक्तिक चिन्ह असल्याच्या चर्चेलाही सावंत यांनी आक्षेप घेतला. हे शिवसेनेचे पक्षचिन्ह असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. “धनुष्यबाण हे बाळासाहेबांचे वैयक्तिक चिन्ह नव्हते, ते शिवसेनेचे पक्षचिन्ह होते. शिवसेनेच्या सुरुवातीच्या काळात ढाल-तलवार हे चिन्ह होते, त्यानंतर मशाल होती आणि पुढे धनुष्यबाण आले. त्यामुळे आजही आमची धनुष्यबाणाची मागणी कायम आहे,” असे सावंत म्हणाले. त्याचवेळी सध्याच्या राजकीय परिस्थितीत ठाकरे गट मशाल चिन्हावर निवडणूक लढवत असला तरी धनुष्यबाणावरील दावा कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## साठ्ये कॉलेजबाहेर तुफान राडा




**मुंबई :** मुंबईतील विलेपार्ले पूर्व येथे असलेल्या नामांकित साठ्ये महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. महाविद्यालयात नव्या विद्यार्थ्यांच्या सदस्य नोंदणी मोहिमेवरून या दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद सुरू झाला होता. मात्र, पाहता-पाहता या वादाचे रूपांतर थेट तुफान हाणामारीत झाल्याने महाविद्यालय परिसरात मोठा गोंधळ उडाला आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले.


या राड्याची माहिती मिळताच विलेपार्ले पोलिसांनी कसलाही विलंब न लावता तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून गोंधळ घालणाऱ्या दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे कॉलेज परिसरात काही काळ भीतीचे वातावरण होते, मात्र पोलिसांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे पुढील अनर्थ टळला.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने गेल्या 15 दिवसांपासून मुंबईतील विविध महाविद्यालयांच्या बाहेर नवीन विद्यार्थ्यांसाठी सदस्य नोंदणी मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून गुरुवारी विलेपार्ले येथील साठ्ये महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराबाहेर मनविसे आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या दोन्ही संघटनांचे स्टॉल समोरासमोर लावण्यात आले होते. यादरम्यान, स्टॉलच्या जागेवरून आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आपल्या गटाकडे आकर्षित करण्याच्या चढाओढीवरून या दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची होऊन मोठा वाद उफाळून आला.

या वादाच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या कार्यकर्त्यांनी एबीव्हीपीवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. साठ्ये महाविद्यालयात ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना एबीव्हीपीचे कार्यकर्ते बळजबरीने पकडून आपल्या स्टॉलवर नेत होते आणि जबरदस्तीने त्यांची सदस्य नोंदणी करत होते, असा दावा मनसेने केला आहे. एवढेच नाही तर, महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे हात पकडून त्यांना ओढत नेत त्यांचीही बळजबरीने नोंदणी केली जात असल्याचा धक्कादायक आरोप मनविसेकडून करण्यात आला असून, याच कारणावरून दोन्ही गटांमधील तणाव अधिक वाढून त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले.

बळजबरीने सदस्य नोंदणी करण्याच्या आणि स्टॉलच्या जागेवरून निर्माण झालेल्या वादातून दोन्ही संघटनांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. सुरुवातीला झालेली शाब्दिक चकमक लवकरच जोरदार हाणामारीत बदलली, ज्यामुळे कॉलेजच्या मुख्य रस्त्यावर मोठी गर्दी जमा होऊन विद्यार्थ्यांमध्ये घबराट पसरली. मात्र, घटनेची माहिती मिळताच विलेपार्ले पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या साठ्ये कॉलेज परिसरात तणावपूर्ण शांतता असून, गोंधळ घालणाऱ्या कार्यकर्त्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया आणि या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून वेगाने सुरू आहे.

## 23 ऑगस्ट रोजी मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांशी कुलगुरूंचा संवाद कार्यक्रमाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर, :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यापीठाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘कुलगुरू यांचा विद्यार्थ्यांसोबत संवाद’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचे कुलगुरू मा. संजीव सोनवणे हे विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बदल, मुक्त व दूरस्थ शिक्षणातील नवीन संधी, अभ्यासक्रमातील सुधारणा तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीशी संबंधित विविध बाबींची माहिती या संवादातून मिळणार आहे.हा कार्यक्रम रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भुवन कला, वाणिज्य महाविद्यालय, औरंगपुरा येथील भूमकर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.या संवाद कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर शहरातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रांवरील द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमास संबंधित अभ्यासकेंद्रांचे केंद्रप्रमुख (प्राचार्य) व केंद्रसंयोजक यांनीही उपस्थित राहावे, अशी सूचना विद्यापीठाच्या विभागीय केंद्राकडून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रक्रियेबाबत थेट कुलगुरूंशी संवाद साधण्याची आणि आपल्या अडचणी, शंका व अपेक्षा मांडण्याची संधी या कार्यक्रमामुळे उपलब्ध होणार आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांना बदलत्या शैक्षणिक व्यवस्थेशी परिचित करून देणे, त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला योग्य दिशा देणे आणि विद्यापीठ व विद्यार्थी यांच्यातील संवाद अधिक दृढ करणे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश असल्याचे मानले जात आहे.विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहून या संवाद कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन नंदकुमार रा. राठी, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६


## कॅप्टन डॉ गजानन सानप यांना 'बेस्ट एएनओ' पुरस्कार




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : राष्ट्रीय छात्र सेना,50 महाराष्ट्र बटालियन यांच्याद्वारे राष्ट्रीय छात्र सेनेच्या महाविद्यालयीन व शालेय असोसिएट एनसीसी अधिकारी यांची एक दिवसीय परिषद छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय येथे दिनांक 18 ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती.वार्षिक नियोजन, आढावा, विविध शिबिरे, अभ्यासक्रम, परीक्षा, उपक्रम कार्यक्रम यांचा वार्षिक आढावा घेण्यासाठी व पुढील वार्षिक नियोजन, यासाठी सदरील परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी 50 महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बी पी एस ठाकूर, ऑडम ऑफिसर लेफ्टनंट कर्नल कीर्ती मुंडले यांची प्रमुख उपस्थिती होती.कर्नल बी पी एस ठाकूर यांना गार्ड ऑफ ऑनर देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.सदरील परिषदेसाठी मराठवाड्यातील विविध कॉलेजेस व शाळा यांचे एनसीसी अधिकारी उपस्थित होते.राष्ट्रीय छात्र सेना गट मुख्यालय आयोजित एएनओ परिषदेत सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचे एएनओ कॅप्टन डॉ गजानन सानप यांना 'बेस्ट एएनओ (SD/SW)' पुरस्काराने गौरविण्यात आले.कॅप्टन डॉ सानप यांनी मराठवाड्यात राष्ट्रीय छात्रसेनेचा ऐच्छिक विषय म्हणून प्रभावीपणे विस्तार व अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील NCC संदर्भातील पायाभूत सुविधा विकसित करण्यामध्येही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.राष्ट्रीय छात्रसेना मुख्यालय द्वारा सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय येथे संपन्न झालेल्या या परिषदेत संपूर्ण वर्षभर राष्ट्रीय छात्र सेनेच्या होणाऱ्या विविध शिबिरांची तसेच दैनंदिन उपक्रम, कार्यक्रम त्यांची अंमलबजावणी, राष्ट्रीय छात्र सेना अभ्यासक्रम, व ए, बी व सी सर्टिफिकेट परीक्षेची विद्यार्थ्यांची तयारी, विद्यापीठ स्तरावर राष्ट्रीय छात्र सेना अभ्यासक्रमाची अंमलबजावणी या विषयात कमांडिंग ऑफिसर कर्नल बी पी एस ठाकूर यांनी सर्व एनसीसी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.या परिषदेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या इतर एएनओंचाही गौरव करण्यात आला. होली क्रॉस मराठी स्कूल, छत्रपती संभाजीनगरचे S/O अशोक पाटील यांना शालेय स्तरावर 'बेस्ट एएनओ (JD/JW)' पुरस्कार देण्यात आला. तसेच कॅप्टन शोण पाटील, एएनओ, MIT कॉलेज, छत्रपती संभाजीनगर यांना महाराष्ट्र EBSB-I कॅम्प २०२६ मधील उत्कृष्ट योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी अलीकडे PRCN/Refresher Course पूर्ण करून पदोन्नती मिळविलेल्या एएनओंचा 'पिपिंग सेरेमनी'द्वारे सन्मान करण्यात आला. यामध्ये कॅप्टन डॉ गजानन सानप (एस. बी. कॉलेज ऑफ सायन्स), कॅप्टन बाळाजी जोकरे (व्ही. एन. कॉलेज), S/O सुनील सांगळे (ज्ञानेश विद्या मंदिर), S/O वारकड किरण (PM श्री KV Shift-II) आणि लेफ्टनंट विजय माटकर (शिवाजी कॉलेज, कन्नड) यांचा समावेश होता.५० महाराष्ट्र बटालियन NCC मधील MIT कॉलेजचे कॅडेट अभिजित कुंदे यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. EBSB-I कॅम्पमध्ये त्यांनी 'कॅम्प सीनियर' म्हणूनही जबाबदारी पार पाडली.कार्यक्रमाच्या शेवटी शैक्षणिक वर्ष 25 -26 मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एएनओ, अधिकारी व NCC कर्मचाऱ्यांचा गौरव करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कॅप्टन डॉ गजानन सानप यांच्या या पुरस्काराबद्दल ब्रिगेडियर ए बरबरे, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ विजय फुलारी, प्र कुलगुरू डॉ प्रवीण वक्ते, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अड. दिनेश वकील सरचिटणीस डॉ श्रीरंग देशपांडे, प्राचार्य डॉ सतीश पाटील, प्राचार्य विवेक मिरगणे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील तसेच NCC परिवारातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## हिंदी विषयात डॉ. पूजा मुठ्ठे-कवडे यांना पीएच.डी. पदवी



**दौलताबाद (जावेद अहमद)** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून हिंदी विषयात 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.)' ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉ. पूजा काशीनाथ मुठ्ठे-कवडे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.डॉ. पूजा मुठ्ठे-कवडे यांनी "डॉ. विश्वास पाटील का रचना संसार" या विषयावर सखोल व अभ्यासपूर्ण संशोधन करून पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांच्या संशोधनातून डॉ. विश्वास पाटील यांच्या साहित्याचा विविध अंगांनी अभ्यास करण्यात आला असून, हिंदी विषयातील त्यांच्या शैक्षणिक कार्याला या संशोधनामुळे महत्त्वपूर्ण योगदान मिळाले आहे.या संशोधनासाठी त्यांना प्रा. डॉ. सुधाकर आर. शेंडगे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे विभागाध्यक्ष डॉ. संजय राठोड यांचे मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रोत्साहन मिळाले.डॉ. पूजा मुठ्ठे-कवडे यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल परिवारातील सदस्य, सहकारी, मित्रपरिवार तसेच हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.


**१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी**

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT** — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY** — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

**C.T.SCAN** — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

**E.C.G.** — कालावधी १ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

**O.T. TECHNICIAN** — कालावधी २ वर्ष — पात्रता : १०वी ,१२ वी पास

**PG RADIOLOGY** — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) — पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी** — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी** — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री** — कालावधी २ वर्ष — पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६

## वाळवंटातील जहाज

कष्टाळू उंट प्राणी
सोशिक आणि शांत
पाठीवर ओझे वाहत
प्रवास करतो निवांत

पाठीवरील कुबडाला
म्हणतात सर्व मदार
धण्यासाठी धडपड करतो
मन त्याचं उदार

बंद होणाऱ्या नाकपुड्यामुळे
धुळीपासून होते संरक्षण
भूक लागली की उंट
झाडपाला करतो भक्षण

विसरतो भूक तहान
सतत कष्ट करतांना
दु:ख दाखवित नाही
तप्त वाळूत चालतांना

वाळवंटातील जहाज म्हणून
सर्वत्र त्याची ख्याती
काम बजावतो तो
जपून माणूसकीची नाती



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## जगून घ्यावे मस्तीत!

जोवर आहे जिवंत,
तोवर जगून घ्यावे.
सुटत नसलेले प्रश्न,
तसेच सोडून द्यावे.

उगीच उद्यासाठी,
कशाला करता जमा.
आनंदाने जगताना,
बाळगू नका तमा.

जमा करून करून,
का बरे थकून जाता.
बिमार पडल्यावरती,
दु:खाचे गीत गाता.

आज आत्ताचे क्षण,
जगून घ्यावे मस्तीत!
मनासारखे जगताना,
जीवन जगावे शिस्तीत.

म्हणून म्हणतो माणसा,
सदा आनंदाने जगावे.
गरजा मर्यादित ठेवून,
स्वप्न साकारतांना बघावे.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतूनअवयव प्रत्यारोपणासाठी ७९५ रुग्णांना १५.७३ कोटींची मदत




**मुंबई / बीड (भगवंत पाळवदे) :** यकृत, मूत्रपिंड, फुप्फुस, हृदय आदी अवयव निकामी झाल्यानंतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हाच रुग्णांसाठी शेवटचा पर्याय ठरतो. मात्र, या उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे करतो. या अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी राज्यातील गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरत असून, आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ७९८ रुग्णांना १५ कोटी ७९ लाख ६६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होत आहेत. त्यामुळे किडनी, यकृत, हृदय आणि फुप्फुस निकामी झालेल्या अनेक रुग्णांसाठी उपचाराची नवी आशा निर्माण झाली आहे. मात्र, अशा शस्त्रक्रियांसाठी खाजगी रूग्णालयात लाखो रुपयांचा खर्च येत असल्याने अनेक गरजू रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.अशा कठीण परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून, त्यांच्या कुटुंबांनाही मोठा दिलासा मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रुग्णकेंद्रित करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू करण्यात आली आहे.या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय मदत अधिक वेगाने उपलब्ध होत आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठीचा अर्ज आता रुग्णाऐवजी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयामार्फत थेट सादर केला जात आहे. त्यामुळे रुग्णांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता राहिली नाही. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अर्ज मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण होत असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांना गती मिळणार आहे.१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत : १५.७९ कोटींची मदतमूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रुग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रुपयांची मदत देण्यात आली.यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना ३ कोटी २१ लाख ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली.फुप्फुस प्रत्यारोपणासाठी 03 रूग्णांना 6 लाख रूपयांची मदत देण्यात आली.तर, हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रुग्णांना २८ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.अवयव प्रत्यारोपणासारख्या खर्चिक उपचारांसाठी आर्थिक मदत वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान, अद्यावत करण्यात आली आहे. गरजू रूग्णांनी 1800 123 2211 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर अदनानला जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढले



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील कौसडी शिवारात बुधवारी (दि. १९ ऑगस्ट) दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास तीन वर्षीय चिमुकला बोअरवेलमध्ये पडल्याची धक्कादायक घटना घडली. अदनान शेख नदीम (वय ३ वर्षे, रा. कौसडी) हा चिमुकला गट क्रमांक २५ मधील शेतातील बोअरवेलमध्ये सुमारे दहा फूट खोलीवर अडकला होता. घटनेनंतर ग्रामस्थांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. तब्बल तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर ग्रामस्थ व प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नातून अदनानला बोअरवेलमधून सुखरूप बाहेर काढण्यात आले.घटना लक्षात येताच कुटुंबीय तसेच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. बोअरवेल अरुंद असल्याने थेट आत जाऊन बचाव करणे शक्य नसल्याने बोअरवेलच्या बाजूने खोदकाम करून चिमुकल्यापर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. ग्रामस्थांनी दोन जेसीबीच्या सहाय्याने युद्धपातळीवर खोदकाम सुरू केले.दरम्यान, घटनेची माहिती प्रशासनाला देण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी संजय सिंग चव्हाण, एसडीएम शैलेश लाहोटी, डीवायएसपी विभुते, तहसीलदार शीतल कच्छवे, नायब तहसीलदार प्रशांत राखे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे, पीएसआय महादेव गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य माणिक हरकळ, पोलीस कर्मचारी साठवणे, मोरे, मंडळ अधिकारी सोनवणे, तलाठी प्रदीप कालवे तसेच आरोग्य विभागाच्या डॉ. प्रतिभा भालेराव यांच्यासह प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी ठाण मांडून बचावकार्यावर लक्ष ठेवून होते. चिमुकल्याला कोणतीही इजा होऊ नये, यासाठी अत्यंत काळजीपूर्वक खोदकाम करण्यात येत होते. ग्रामस्थ आणि प्रशासनाच्या अथक प्रयत्नांमुळे अखेर सुमारे तीन तासांनंतर जेसीबीच्या सहाय्याने अदनानला बोअरवेलमधून सुखरूप बाहेर काढण्यात आले.अदनानला सुखरूप बाहेर काढण्यात आल्यानंतर घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. या घटनेमुळे घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. चिमुकला सुखरूप बाहेर आल्याने त्याच्या कुटुंबीयांनी प्रशासन तसेच बचावकार्यात सहभागी झालेल्या ग्रामस्थांचे आभार मानले.ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आणि प्रशासनाच्या अथक प्रयत्नांमुळे तीन वर्षांच्या अदनानला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६


## नवराष्ट्रनिर्मितीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनातून ठेऊन राष्ट्रहिताचे शिक्षण युवकांना देण्याची गरज



**चिंतन (भूमिपुत्र वाघ) :** भारताच्या नवराष्ट्रनिर्मितीची खरी पायाभरणी ही केवळ मोठमोठ्या इमारती, रस्ते, उद्योग किंवा तंत्रज्ञानाच्या विकासातून होणार नाही; ती होईल वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या, जबाबदार आणि राष्ट्रहिताची जाणीव असलेल्या नागरिकांच्या निर्मितीतून. शिक्षण हे या परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांच्या हातात केवळ पदवी देण्याऐवजी त्यांच्या मनात प्रश्न विचारण्याची, समस्यांकडे वैज्ञानिक पद्धतीने पाहण्याची आणि समाजासाठी उपाय शोधण्याची वृत्ती निर्माण करणे ही काळाची गरज आहे.याच विचारातून पुण्यात कार्यरत असलेल्या स्वरूप वर्धिनी या संस्थेचे सामाजिक कार्य विशेष महत्त्वाचे ठरत आहे पुणे जिल्ह्यात शिक्षण, सामाजिक विकास आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून संस्थेने निर्माण केलेले कार्यक्षेत्र प्रेरणादायी आहे. समाजसेवक विलास कुलकर्णी यांनी आपल्या कार्यातून विज्ञान, समाज आणि पर्यावरण यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला आहे.विलास कुलकर्णी यांची विशेष ओळख सांडपाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून आहे. सांडपाणी ही समस्या आहे, असे मानण्यापेक्षा त्याकडे संसाधन म्हणून पाहण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्या कार्यामध्ये दिसून येतो. योग्य प्रक्रिया, पुनर्वापर आणि नियोजनाच्या माध्यमातून सांडपाण्याचे व्यवस्थापन करता येते आणि पर्यावरणाचे संरक्षण करता येते, हा विचार समाजापर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. आणि ते मोठे काम विलास कुलकर्णी हे करत आहेत.आज देशासमोर पाणीटंचाई, प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, हवामान बदल, शेतीतील समस्या, बेरोजगारी आणि वाढते शहरीकरण अशी अनेक आव्हाने आहेत. या समस्यांचे निराकरण केवळ शासनाने करावे, अशी अपेक्षा ठेवून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने समस्या समजून घेतली पाहिजे आणि तिच्या निराकरणामध्ये आपली भूमिका ओळखली पाहिजे. हे शिक्षणातूनच शक्य आहे.शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील विज्ञान शिकविण्याऐवजी त्यांच्या परिसरातील प्रत्यक्ष प्रश्नांशी जोडले पाहिजे. आपल्या गावातील पाणी कुठून येते? सांडपाणी कुठे जाते? पावसाचे पाणी कसे साठवता येईल? कचऱ्याचे वर्गीकरण कसे करावे? झाडांचे संवर्धन कसे करावे? ऊर्जा बचत कशी करावी? अशा प्रश्नांवर विद्यार्थ्यांनी प्रयोग, सर्वेक्षण आणि प्रत्यक्ष कृती करावी. शिक्षण जर जीवनाशी जोडले गेले, तर विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारा युवक राहत नाही; तो समाज घडविणारा नागरिक बनतो.नवराष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षणाचा प्रवाह राष्ट्रहिताचा असणे म्हणजे कोणत्याही एका क्षेत्रापुरते शिक्षण मर्यादित न ठेवता त्यातून सामाजिक जबाबदारी, पर्यावरण संवर्धन, स्वावलंबन, प्रामाणिकपणा, श्रमप्रतिष्ठा आणि वैज्ञानिक विचार विकसित करणे होय.विलास कुलकर्णी यांच्या कार्यातून आपल्याला एक महत्त्वाचा संदेश मिळतो समस्या कितीही मोठी असली तरी तिच्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून असला पाहिले, तर समाधानाचा मार्ग नक्की सापडतो. सांडपाणी व्यवस्थापनासारख्या विषयाला सामाजिक चळवळीचे स्वरूप देणे ही देखील शिक्षणाचीच एक प्रक्रिया आहे. कारण आजचा विद्यार्थी उद्याचा अभियंता, शास्त्रज्ञ, प्रशासक, शेतकरी, उद्योजक किंवा समाजसेवक असेल; त्याच्या निर्णयांवर भविष्यातील भारत अवलंबून आहे.आपल्याला असा भारत निर्माण करायचा आहे की,जिथे शिक्षण म्हणजे केवळ प्रमाणपत्र मिळविण्याचे साधन नसेल, तर राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी साधन असेल. प्रत्येक गावात वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रत्येक शाळेत प्रयोगशीलता, प्रत्येक तरुणामध्ये सामाजिक बांधिलकी आणि प्रत्येक नागरिकामध्ये पर्यावरणाची जाणीव निर्माण झाली, तर नवराष्ट्रनिर्मितीचे स्वप्न निश्चितच साकार होईल.समाजसेवक विलास कुलकर्णी यांचे कार्य हे याच व्यापक विचाराचे एक प्रेरणादायी उदाहरण आहे. स्वरूप वर्धिनीसारख्या संस्था आणि समाजाशी नाळ जोडून काम करणारे कार्यकर्ते शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाशी जोडत आहेत, ही आशादायी बाब आहे.आज गरज आहे ती शिक्षणाच्या दिशेला नव्याने विचार करण्याची. विज्ञानाची दृष्टी, समाजसेवेची वृत्ती, पर्यावरणाची जाणीव आणि राष्ट्रहिताची भावना या चार आधारस्तंभांवर भारताच्या नव्या पिढीची उभारणी झाली, तर आपला देश केवळ विकसित राष्ट्र होणार नाही, तर संवेदनशील, स्वावलंबी, पर्यावरणपूरक आणि जबाबदार राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील.नवराष्ट्रनिर्मितीची सुरुवात संसदेतून नव्हे, तर प्रत्येक घरातील शिक्षणातून आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या विचारातून होते. त्या विचारांना वैज्ञानिक दिशा देणे हीच आजची खरी राष्ट्रसेवा आहे...

## जेईएस चे माजी प्राचार्य सिकची यांना श्रद्धांजली



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.गो.रा. सिकची यांचे दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांना जेईएस महाविद्यालय जालना, येथे जालना एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, कार्यालयीन प्रबंधक श्री बाबाजी साळुंखे, कार्यालयीन अधीक्षक महेश लोकलकर, उपप्राचार्य डॉ.मोगले, उपप्राचार्य डॉ.सुमंत बिक्कड पर्यवेक्षक डॉ फुलचंद मोहिते, व प्रा.ज्ञानेश्वर धनवे,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजप संभाजीनगर जिल्हासचिवपदी बबनराव बनसोड यांची नियुक्ती



**कन्नड (अरुण थोरात) :** भारतीय जनता पार्टी छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव पदी बबनराव बनसोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या आदेशाने छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही निवड जाहीर केली आहे.बबनराव बनसोड यांनी मुंडवाडी ता.कन्नड येथील मा.सरपंच, सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन होते. तसेच सहकारी संस्थां सह समाजकारण, राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधीत्व केले, राजकीय मुत्सद्दी, संभाषण व संघटन कौशल्य, संयमशील वकृत्व, तालुक्यात सर्वदूर असलेला परिचय, भौगोलिक सामाजिक क्षेत्रांची जाण, अभ्यास, यामुळे ते तालुकाभरात परिचीत आहे. त्यांच्या या नियुक्ती बद्दल त्यांचेआ.अतुल सावे ओबीसी कल्याण व दुग्धविकास मंत्री, भागवत कराड माजी केंद्रीय मंत्री, जिल्हा अध्यक्ष संजय खंबायते, जि.प सदस्य संजय गव्हाणे, किशोर आबा पवार, डॉ. दिलीपसिंग राजपूत, जि.प.सदस्या मंजुषा मलदुडे, सुभाषराव काळे सरचिटणीस, मंडळ अध्यक्ष सुनील पवार, ललित सुराशे ,श्रीराम जंजाळ, सुधाकर देवकर नगरसेवक, गजानन आव्हाळे, नगरसेवक प्रेमसिंग बैनाडे नगरसेवक, अध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष हभप.साहेबराव गवळी, कैलास जाधव, सुदाम पवार आदींनी अभिनंदन केले आहे.






MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ NEWS

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६


## प्लास्टिक बंदीविरोधात जिंतूर नगरपंचायतीचा पुन्हा धडाका



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : शहरात सिंगल यूज प्लास्टिकचा वापर व विक्री करणाऱ्यांविरोधात जिंतूर नगरपंचायतीच्या पथकाने पुन्हा एकदा कारवाईचा धडाका सुरू केला आहे. सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी नगरपंचायतीच्या पथकाने शहरातील विविध भागांत तपासणी करून प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करणाऱ्या विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत जवळपास १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.नगरपंचायतीच्या पथकाने शहरातील किराणा दुकाने, भाजीपाला विक्रेते तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांची तपासणी केली. शासनाने प्रतिबंधित केलेल्या सिंगल यूज प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर व विक्री होत असल्याचे आढळून आलेल्या ठिकाणी संबंधितांकडून दंड वसूल करण्यात आला. यापुढेही अशीच नियमित तपासणी सुरू ठेवण्यात येणार असल्याचे नगरपंचायतीकडून सांगण्यात आले.यापूर्वीही नगरपंचायतीच्या पथकाने शहरातील विविध भागांत कारवाई करून दुकानदारांना प्लास्टिकचा वापर टाळण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, काही ठिकाणी पुन्हा प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पथकाने कारवाई अधिक तीव्र केली आहे.शहरातील नागरिकांनी खरेदीसाठी कापडी किंवा पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करावा, तसेच व्यापारी व विक्रेत्यांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करू नये, असे आवाहन नगरपंचायतीने केले आहे. प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी पुढील काळातही अचानक तपासणी व दंडात्मक कारवाई सुरू राहणार आहे.चौकटकारवाई सुरूच राहणार — गायत्री ठाकूरनगरपंचायतीच्या पथकाकडून प्लास्टिक बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियमित तपासणी केली जात आहे. नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळून नगरपंचायतीला सहकार्य करावे. प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर किंवा विक्री आढळल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल. शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. — गायत्री ठाकूर, सिटी कोऑर्डिनेटर, जिंतूर नगरपंचायत

## तिफण ट्रेकिंग ग्रुपने सर केले कळसूबाई शिखर



महाराष्ट्राला डोंगर-दऱ्यांचा आणि ट्रेकिंगचा समृद्ध वारसा लाभला आहे. याच वारशाला जपत, छत्रपती संभाजीनगरमधील "तिफण ट्रेकिंग ग्रुप" आणि "तिफण सखी मंच" या दोन गटांनी मिळून महाराष्ट्राचे सर्वोच्च शिखर असलेल्या कळसूबाईवर यशस्वी मोहीम फत्ते केली. केवळ शिखर सर करणे एवढाच उद्देश न ठेवता, या मोहिमेतून देशभक्ती, निसर्गसंवर्धन आणि सांघिक भावनेचा संदेशही देण्यात आला."सह्याद्रीचा एव्हरेस्ट" कळसूबाईअहमदनगर जिल्ह्यातील भंडारदरा धरणाजवळ वसलेले कळसूबाई शिखर समुद्रसपाटीपासून ५४० ० फूट उंच आहे. यालाच "सह्याद्रीचा एव्हरेस्ट" असेही म्हणतात. येथे कळसूबाई देवीचे प्राचीन मंदिर आहे. अतिशय उंच आणि कठीण चढाईमुळे हे शिखर ट्रेकर्ससाठी एक आव्हानात्मक ठिकाण मानले जाते. खडकाळ पायऱ्या, लोखंडी शिड्या आणि खोल दऱ्या ओलांडूनच शिखरावर पोहोचता येते. पावसाळ्यात येथील हिरवागार निसर्ग आणि धुक्यात लपेटलेली शिखरे पाहण्यासाठी राज्यभरातून ट्रेकर्स येथे गर्दी करतात.मोहिमेचे नियोजन आणि प्रवासतिफण ट्रेकिंग ग्रुपच्या वतीने ही मोहीम विशेष नियोजनाने आयोजित करण्यात आली होती. शनिवारी रात्री ग्रुपचे सर्व १६ सदस्य छत्रपती संभाजीनगरहून निघून बारी या कळसूबाईच्या पायथ्याच्या गावात पोहोचले. ट्रेकला सुरुवात करण्यापूर्वी गटाचे मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे यांनी सर्वांना सुरक्षेच्या सूचना दिल्या आणि मार्गाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.रविवारी पहाटे ५ वाजता अंधारातच हातात टॉर्च घेऊन सर्वांनी ट्रेकला सुरुवात केली. रात्रीच्या शांततेत आणि गार वाऱ्यात केलेली ही चढाई अत्यंत कठीण होती. आधी घनदाट जंगल, नंतर तीव्र चढाव असलेला कातळवाटा आणि शेवटी लोखंडी शिड्या चढून जावे लागते. प्रत्येक पायरीवर थकवा जाणवत असतानाही "आपण कळसूबाई सर करणारच" या जिद्दीने सर्व सदस्य पुढे जात होते.पहाटे शिखरावर तिरंगा आणि देशभक्तीचा गजरसुमारे ३ ते ४ तासांच्या अथक परिश्रमानंतर सर्व सदस्य सूर्योदयाच्या वेळीच कळसूबाईच्या शिखरावर पोहोचले. ढगांच्या वरून उगवणारा लालबुंद सूर्य आणि आजूबाजूला पसरलेला सह्याद्रीचा विहंगम नजारा पाहून सर्वांचा थकवा क्षणार्धात दूर झाला. हा क्षण अधिक अविस्मरणीय करण्यासाठी गटाचे मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते शिखरावर तिरंगा फडकवण्यात आला. भगवा, पांढरा, हिरवा झेंडा डोंगरावर फडकताच संपूर्ण परिसरात "भारत माता की जय", "वंदे मातरम" आणि "छत्रपती शिवाजी महाराज की जय" या घोषणा घुमू लागल्या. देशभक्तीच्या भावनेने सर्वांचे डोळे पाणावले. त्यानंतर कळसूबाई देवीचे दर्शन घेऊन सर्वांनी शिखरावर फोटो काढून या क्षणाला कायमचे कैद केले.निसर्गसंवर्धनाचा संदेश: "स्वच्छ सह्याद्री"केवळ ट्रेक करून परतणे हा तिफण ग्रुपचा उद्देश नव्हता. परतीच्या वाटेवर सर्व सदस्यांनी "स्वच्छ सह्याद्री" ही मोहीम राबवली. शिखराच्या परिसरात पर्यटकांनी टाकलेला प्लास्टिकचा कचरा, बाटल्या आणि इतर घाण त्यांनी स्वतःहून गोळा केली. निसर्गाला कोणतीही हानी न पोहोचवता ट्रेक कसा करावा याचा आदर्श त्यांनी इतर ट्रेकर्ससमोर ठेवला. दुपारी सर्व सदस्य सुरक्षितपणे बारी गावी परतले.या मोहिमेमागील उद्देशतिफण ट्रेकिंग ग्रुपचे मुख्य उद्दिष्ट केवळ शिखरे सर करणे नाही, तर त्याद्वारे तरुणांमध्ये निसर्गाबद्दल प्रेम, शारीरिक क्षमता वाढवणे आणि सांघिक भावना निर्माण करणे हे आहे. शहरातील धकाधकीच्या जीवनातून बाहेर पडून निसर्गाच्या सानिध्यात वेळ घालवणे, आत्मविश्वास वाढवणे आणि आरोग्य चांगले ठेवणे हे या गटाचे ध्येय आहे.मोहिमेतील सहभागी वीरया यशस्वी मोहिमेत डॉ. शिवाजी हुसे, विलास कापडे, कैलास मुगले, प्रभाकर मुंडे, सोमनाथ ताठे, अनिल ताठे, रघुनाथ ताठे, हरिदास पाले, उर्मिला हुसे, वैशाली कापडे, योगेश्वरी मुंडे, अनुसया मुगले, कल्पना पाले, प्रतिभा ताठे, भारती ताठे आणि कोमल काजे या १६ सदस्यांनी सहभाग घेतला. महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग हीच या गटाची खासियत आहे. कठीण परिस्थितीतही सर्वांनी एकमेकांना मदत करत ही मोहीम पूर्ण केली.कळसूबाई ट्रेकचे महत्त्वकळसूबाई ट्रेक हा केवळ एक साहसी खेळ नाही. हा आत्मपरीक्षणाचा प्रवास आहे. अंधारातून प्रकाशाकडे, थकव्यापासून शिखराच्या आनंदाकडे नेणारा हा प्रवास माणसाला खूप काही शिकवतो. जिद्द, चिकाटी आणि सांघिक कार्य यांची प्रचिती येथे येते. तसेच शिखरावरून दिसणारा निसर्ग माणसाला नम्र व्हायला शिकवतो.तिफण ग्रुपने दाखवून दिले की ट्रेकिंग म्हणजे फक्त फोटो काढणे नाही, तर जबाबदारीने निसर्ग जपणे आणि देशाप्रती प्रेम व्यक्त करणे देखील आहे. पहाटे तिरंगा फडकवण्याचा त्यांचा उपक्रम इतर ट्रेकिंग ग्रुप्ससाठी प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.अशा उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील तरुण पिढी निसर्गाशी जोडली जाईल आणि आपल्या किल्ले-डोंगरांचा इतिहास व भूगोल देखील जिवंत राहील. तिफण ट्रेकिंग ग्रुपच्या या कळसूबाई मोहिमेला व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**डॉ. शिवाजी हुसेतिफण ट्रेकिंग ग्रुप, छत्रपती संभाजीनगर**


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २० ऑगस्ट २०२६

# महिलांसह मोठ्या संख्येने नागरिकांचे पोलिसांना निवेदन




**बुलढाणा (महेश मुंढे) :** हिवरखेड पूर्णा परिसरात सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीमुळे ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली असून, या अवैध व्यवसायाला तातडीने आळा घालण्याची मागणी करत गावातील महिला व पुरुष ग्रामस्थांनी किनगाव राजा पोलीस ठाण्याचे ठाणेदार संजय मातोंडकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी गावातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, परिसरात अवैध दारूविक्रीमुळे सामाजिक वातावरणावर विपरीत परिणाम होत असून, अनेक कुटुंबांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. दारूच्या व्यसनामुळे घरातील आर्थिक परिस्थितीवर परिणाम होण्याबरोबरच कौटुंबिक वाद, अशांतता आणि सामाजिक समस्या वाढण्याची शक्यता असल्याने ग्रामस्थांनी चिंता व्यक्त केली आहे.विशेषतः महिलांनी अवैध दारूविक्रीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत पोलिस प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली. गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनातून सांगितले.अवैध दारूविक्रीमुळे ग्रामस्थ त्रस्त,,हिवरखेड पूर्णा परिसरात अवैध दारूविक्रीमुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावातील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जाऊ नये, तसेच महिलांना व कुटुंबांना सुरक्षित व शांत वातावरण मिळावे, यासाठी अवैध दारूविक्री पूर्णपणे बंद करण्याची मागणी करण्यात आली.गावात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी आणि अवैध धंद्यांना कोणत्याही प्रकारे प्रोत्साहन मिळू नये, यासाठी पोलिस प्रशासनाने नियमितपणे लक्ष ठेवून कारवाई करावी, अशी अपेक्षाही ग्रामस्थांनी व्यक्त केली.महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग,,या निवेदनाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महिलांनी मोठ्या संख्येने पुढाकार घेतला. अवैध दारूमुळे निर्माण होणाऱ्या कौटुंबिक व सामाजिक समस्यांमुळे महिलांमध्ये अस्वस्थता असल्याचे यावेळी दिसून आले. महिलांसह पुरुष ग्रामस्थांनी एकत्र येत पोलिस प्रशासनाकडे अवैध दारूविक्री तातडीने बंद करण्याची मागणी केली.ग्रामस्थांनी ठाणेदार संजय मातोंडकर यांच्याकडे परिसरातील अवैध दारूविक्रीची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच भविष्यात अशा प्रकारचे अवैध व्यवसाय पुन्हा सुरू होणार नाहीत, यासाठी पोलिसांनी प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.पोलिसांच्या कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्षदरम्यान, ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाची पोलिस प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन अवैध दारूविक्रीविरोधात ठोस कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. आता पोलिस प्रशासन या तक्रारीवर कोणती कारवाई करते, याकडे हिवरखेड पूर्णा परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.अवैध दारूविक्री बंद करून गावातील सामाजिक वातावरण सुरक्षित व शांत ठेवावे, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांनी केली असून, प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# केंद्रात आणखी एका कॅबिनेटसाठी शिंदे गटाची फिल्डिंग

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारमध्ये मोठ्या मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चेला पुन्हा वेग आला आहे. ऑगस्टमध्येच केंद्रीय मंत्रिमंडळात बदल होण्याची शक्यता असल्याचे संकेत गेल्या काही आठवड्यांपासून मिळत आहेत. मात्र, फेरबदलाची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. या पार्श्वभूमीवर काही मंत्र्यांची खाती बदलली जाऊ शकतात, काहींच्या जबाबदाऱ्या वाढवल्या जाऊ शकतात, तर काही नव्या चेहऱ्यांना केंद्रात संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संभाव्य फेरबदलात महाराष्ट्राच्या राजकारणालाही विशेष महत्त्व मिळू शकते. विशेषतः एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने लोकसभेतील 13 खासदारांची ताकद दाखवल्यानंतर केंद्रातील मंत्रिपदांसाठी आपला दावा मजबूत केला आहे. शिंदे यांच्या पक्षाला आणखी मंत्रिपदे मिळावीत, यासाठी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा झाल्याचे वृत्त यापूर्वी समोर आले आहे. महाराष्ट्रासाठी या फेरबदलातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा केंद्रातील दावा. जूनमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे 6 लोकसभा खासदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत दाखल झाले. त्यानंतर शिंदे यांच्या पक्षाची लोकसभेतील संख्या 7 वरून 13 झाली, तर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे 3 खासदार उरले. या घडामोडीला शिंदे गटाने 'ऑपरेशन टायगर'चे यश म्हणून मांडले. या सहा खासदारांमध्ये संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील, नवनिर्वाचित? नागेश पाटील आष्टिकर, ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा समावेश आहे.

# मुंबई महापालिकेचा नगरविकास खात्यावर आक्षेप



**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याच्या कारभारावर आता थेट मुंबई महापालिकेकडूनच आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांनी नगरविकास विभागाला थेट पत्र पाठवून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कारभारावर बोट ठेवले आहे. महापालिका आयुक्तांच्या या पत्रामुळे सध्या मंत्रालयात आणि राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.

नगरविकास खात्यांतर्गत येणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून आपल्या अधिकारांचा मोठा गैरवापर केला जात असल्याचा आरोप अश्विनी भिडे यांनी पत्रात केला आहे. झोपडपट्टी नसलेल्या मोकळ्या भूखंडांच्या पुर्नविकासाच्या नावाखाली 'एसआरए'कडून नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात असून, प्राधिकरणाच्या या मनमानी कारभारामुळे मुंबई महापालिकेच्या महसुलावर अत्यंत प्रतिकूल परिणाम होत असल्याचे आयुक्त भिडे यांनी स्पष्ट केले आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 33(10) नुसार प्रत्यक्ष झोपडपट्टी असलेल्या क्षेत्राचा पुर्नविकास केला जातो, तर मोकळ्या भूखंडांच्या पुर्नविकासासाठी नियम 33(11) लागू होतो. एसआरए योजनांतर्गत विकासकांना अधिमूल्यात मोठी सवलत दिली जाते. मात्र, नियमानुसार 33(11) अंतर्गत येणाऱ्या मोकळ्या भूखंडांच्या योजनांना ही सवलत लागू होत नाही. तरीही एसआरए प्राधिकरणाकडून या योजनांनाही सवलतीचा बेकायदेशीर लाभ दिला जात असल्याचा मुख्य आक्षेप महापालिकेने घेतला आहे. विशेष म्हणजे, अशा प्रकारे सुमारे 300 योजना बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे.

यापूर्वी तत्कालीन महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी 29 ऑगस्ट 2024 रोजी या प्रकारावर तीव्र आक्षेप नोंदवला होता. त्यानंतर नगरविकास विभागाने स्पष्ट आदेश जारी करून 33(11) नियमावली एसआरए योजनांसोबत जोडता येईल, असे स्पष्ट केले होते. मात्र, नगरविकास विभागाच्या या आदेशाचे एसआरएएकडून तंतोतंत पालन केले जात नसल्याचे विद्यमान आयुक्त अश्विनी भिडे यांनी पत्रात नमूद केले आहे.

एसआरएच्या या कारभारामुळे मुंबई महापालिकेच्या नगरनियोजन विभागाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. त्यामुळे यापुढे नियम 33(11) अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनांची जबाबदारी आणि सर्व अधिकार पूर्णपणे मुंबई महापालिकेकडेच सोपवण्यात यावेत, अशी ठाम मागणी आयुक्त भिडे यांनी नगरविकास खात्याकडे केली आहे.